Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

## November - 2025

**रोटरी फाउंडेशन विशेषांक**



**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary

The Rotary Foundation

# Table of Contents


- Editorial
- Article
- Guest Editor
- Annapurna Donors
- R.I. President Message
- Photo Gallery
- November 100% Attendance
- November Projects


मुद्रक :
क्रिएटीव आर्टस अँड ग्राफीक्स
मित्र नगर, खोरी गल्ली, लातूर
9730887221, 9834827710

# संपादकीय मनोगत



प्रिय रोटेरियन बंधूंनो,


रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन च्या ''दिशा'' या मासिक बुलेटिनचा नोव्हेंबर अंक आपल्या हाती देताना मला विशेष समाधान वाटत आहे. प्रत्येक महिन्याच्या प्रवासात दिशा बुलेटिन अधिक समृद्ध, अधिक माहितीपूर्ण व अधिक प्रभावी होत आहे, ही आनंदाची बाब आहे.नोव्हेंबर महिना रोटरीमध्ये ''रोटरी फाउंडेशन मंथ'' म्हणून साजरा केला जातो. रोटरीच्या सेवाभावी कार्याची पायाभरणी करणाऱ्या फाउंडेशनच्या योगदानाची जाणीव करून देणारा हा महिना विशेष महत्त्वाचा आहे. शांती, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, आपत्ती व्यवस्थापन, पोलिओ निर्मूलन अशा असंख्य क्षेत्रात जगभरात बदल घडवणारे प्रकल्प रोटरी फाउंडेशनच्या उदार योगदानातून आणि विश्वासातून साकार झालेले आहेत. या महान कार्याची प्रेरणा सदस्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचावी, यासाठी यावर्षीचा ''रोटरी फाउंडेशन मंथ विशेषांक'' प्रकाशित करण्याचा आमचा प्रयत्न आहे.आपल्या क्लबमधील प्रत्येक सदस्याचा सहभाग, योगदान आणि सेवाभाव यामुळे दिशा अधिक अर्थपूर्ण व अधिक प्रभावी बनत आहे. आपले लेखन, सूचना आणि प्रोत्साहन आम्हाला अशाच उत्तम अंकांची निर्मिती करण्याची प्रेरणा देतात.चला तर, रोटरी फाउंडेशनच्या सेवाभावी परंपरेला पुढे नेत राहू आणि ''सेवा सर्वोपरि'' या मूल्याला अधिक दृढ करू.

आपला,
रो.अमोल बनाळे
संपादक,दिशा बुलेटिन
रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन

## Rotary Disha Editorial Committee



Rtn.Amol Banale



Rtn.Chandrakant Gastgar



Rtn.Pramod Kumbhar



Rtn.Rohit Kulkarni

## Birthdays

Manmath Panchakshari - 4 Nov
Dr.Shriniwas Bhande - 8 Nov
Dr.Mahesh Sonar - 12 Nov
Dr.Sanjay Shivapuje - 16 Nov
Subodh Somani - 16 Nov
Dhiren Tiwari - 21 Nov
Prasad Warad - 22 Nov
Dr Indrajit Lakade - 25 Nov
Parvat Nagure - 30 Nov



## Anniversaries

Dinesh Soni -19 Nov
Jay Prakash Soni - 21 Nov
Amol Dadge - 23 Nov
Nilesh Itkar - 28 Nov

## Guest Editor Rtn.Santosh Gandhi



प्रिय रोटेरीयन बांधवांनो,

नोव्हेंबर महिना रोटरीत विशेष मानाचा आहे. कारण हा महिना Rotary Foundation Month म्हणून साजरा केला जातो रोटरीच्या मुलभूत तत्त्वांचा, सेवेच्या परंपरेचा आणि मानवतेसाठीच्या निस्वार्थ योगदानाचा सन्मान करणारा महिना.

रोटरी फाउंडेशन हे केवळ एक आर्थिक साधन नाहीते जगभरातील लाखो लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवणारी जागतिक शक्ती आहे.

आरोग्य, शिक्षण, पाणी-स्वच्छता, शांतता, पर्यावरण आणि आर्थिक विकासया सात क्षेत्रांत रोटरी फाउंडेशनने केलेले योगदान आज जगभरातील कोट्यवधी लोकांचे जीवन सुधारत आहे. यामागे असतात आपल्या सारख्या रोटेरियनची निस्वार्थ देणगी, बांधिलकी, वेळ आणि श्रम.

TRF चे डायरेक्टर म्हणून मला सतत जाणवते की‘‘प्रत्येक छोट्या देणगीत एक जीवन बदलण्याची ताकद असते.’’आपला क्लब रोटरी फाउंडेशन च्या माध्यमातून गेली अनेक वर्षे समाजाच्या विविध स्तरांवर प्रभावी प्रकल्प राबवत आला आहे. आज रोटरी क्लब ऑफ  लातूर मिडटाऊन ही सेवा, समर्पण आणि विश्वासाची ओळख बनली आहे आणि याचे श्रेय आपणा सर्व सदस्यांच्या सामूहिक प्रयत्नांना जाते.रोटरी फाउंडेशन महिन्यात आपण सर्वांनी एकत्रितपणे हे लक्षात ठेवले पाहिजे की  ला दिलेली देणगी ही खर्च नसून मानवतेत केलेली गुंतवणूक आहे.ही गुंतवणूक नवीन पिढी सक्षम करते, आजारींना आरोग्य देते, गरिबांना आशा देते आणि समाजाला नवी दिशा देते.

या विशेषांकाच्या माध्यमातून रोटरीच्या या उदात्त कार्याचा आढावा घेताना मला अपार आनंद होत आहे. संपादकीय कार्यात सहभागी होण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आणि सन्मानाची बाब आहे.

चला, या महिन्यात आपण सर्वांनी एकत्र येऊन TRF च्या माध्यमातून समाजसेवेची नवी उंची गाठूया.आपले दान, आपला वेळ आणि आपले ज्ञान हेच रोटरी फाउंडेशनचे खरे बळ आहे.

**रो. संतोष गांधी**
अतिथी संपादक - दिशा बुलेटीन

## Message from R.I. President



This November, as we celebrate The Rotary Foundation, I invite you to consider not only what we give but why we give. The Foundation is more than a fund for projects. It is the beating heart of our promise that service, rooted in trust and friendship, can create lasting change.

Our Action Plan calls us to increase our impact, and the Foundation is how we make this vision real. Since 1988, Rotary and our partners have immunized nearly 3 billion children against polio. We have committed more than $2.6 billion to this cause, and last year alone we directed $146 million toward the final push for eradication. These numbers are significant, but the true impact is not in statistics — it is in the lives of children who will never again fear polio. It is in the hope restored to families and the peace built in communities once defined by disease.

But polio is only one story among many. Each year, Rotary Peace Centres train new generations of leaders who will transform conflict into dialogue and division into understanding. In 2023-24, nearly 100 new fellows began their studies, continuing a legacy of more than 1,800 peace builders from over 140 countries. When we invest in them, we are planting seeds of peace that will bear fruit for decades to come.

The Foundation also touches lives through district and global grants, supporting projects large and small. A clean water well for a rural community, scholarships for young professionals, medical care in the wake of disaster — these are not temporary gestures, but steps toward dignity, resilience, and opportunity. This is how Rotary service becomes lasting impact. And when natural disasters strike, our Foundation allows Rotary to act quickly with disaster response grants.

Our Foundation is not about what we can do alone but what we can do together. Each contribution, no matter its size, joins with others to create a collective act of faith in humanity and in the future.

The last mile of any great journey is always the hardest. We see this in our final steps toward ending polio, in our work for peace, and in every project that seeks to lift people out of despair. Yet every time we give, we declare that our work will continue regardless of the challenge.

This November, let us give with gratitude, with joy, and with hope. Through our Foundation, we Unite for Good, and in doing so, we leave behind not only projects but a legacy of peace, trust, and Service Above Self.

**Francesco Arezzo**
**R.I. President**

# Secretary Report


- राष्ट्रगीताने बैठकीची सुरवात झाली.
- फोर वे टेस्टचे सामुहीक वाचन करण्यात आले.
- स्वर्गीय रो.विश्वास लातूरकर यांच्या दुखःद निधन झाल्यामुळे सभागृहात त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.आणि स्वर्गीय रो. विश्वास लातूरकर यांच्या अकाली निधनामुळे २५/११/२०२५ रोजी होणाऱ्या शोकसभे बाबत ची सविस्तर माहिती अध्यक्ष यांनी अध्यक्षांनी दिली.
- बैठकीस आमंत्रीत वक्ते बँक ऑफ बडोदाचे, लातूर मेन ब्रांचचे चीफ  मॅनेजर श्री अभिनव श्रीवास्तव यांचे  स्वागत  रो. चेतन पढंरीकर यांनी केले.रो. विष्णूभाउ तोष्णीवाल, रो. ओमप्रकाश झुरुळे, रो. डॉ. राजाराम दावणकर, व रो. कपील डुमणे यांचे त्यांच्या आनंद वार्ते बद्दल त्यांचे क्लब तर्फे  अभिनदंन करण्यात आले.
- रो. रविद्रं बनकर यांना मिळालेला Champion of the Champion Award बद्दल क्लब तर्फे  त्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि त्यांनी पार पडलेल्या रोटरी तेजस ईन्स्टीट्युटच्या कामकाजा बाबत सभागृहाला माहीती दिली.
- दि. १४/१२/२०२५ रोजी अहील्यानगर (अहमदनगर)  येथे डिस्ट्रीक्ट TRF सेमीनार होणार आहे. तरी या सेमीनारला आपल्या क्लबच्या जास्तीत जास्त सदस्यानी रजीस्ट्रेशन करून सहभाग नोदंवावा असे अध्यक्षानी सांगितले.
- क्लबचे रोस्टर बाबत सविस्तर माहीती रो. कपील डुमणे यांनी सभागृहाला दिली व या रोस्टच्या कामासाठी प्रोजेक्ट चेअरमन म्हणून रो.प्रशांत भाटगावे यांची निवड करण्यात आली.
- क्लबचे वार्षीक कॅलेडंर बाबत रो.  राजेश दायमा यांनी सभागृहाला सविस्तर माहीती दिली. सदरील प्रोजेक्ट साठी प्रोजेक्ट चेअरमन म्हणून रो.भालचंद्र दानाई यांची नियुक्ती करण्यात आली.
- अन्नपूर्णा योजनेच्या फंड रेजींगसाठी नाटकाचे आयोजन करण्याचे ठरले आहे. या बाबत प्रोजेक्ट चेअरमन रो. सचीन मालू व रो. अमोल बनाळे यांनी दि.१३-१२-२०२५ रोजी दयानंद महाविद्यालय येथील सभागृहात नाटक घेण्याचे निश्चीत झाले बाबत सवीस्तर माहीती सभागृहाला दिली.
- दि. १७-११-२०२५ रोजी TRF ऑफीस येथे मोफत मधुमेह तपासणी शिबीर यशस्वीरित्या पार पडले. या शिबीरा बाबत रो. सदानंद आपशेट्टी यांनी सभागृहाला सविस्तर माहिती दिली.
- क्लबचे साप्ताहीक दिशा बुलेटीनचे प्रकाशन प्रोजेक्ट चेअरमन रो. अमोल बनाळे व पाहुणे श्री.अभिनव श्रीवास्तव यांच्या हस्ते करण्यात आले. सदरील साप्ताहीक दिशा बुलेटीनचे आतीथी संपादक रो.संगीता लातूरे या होत्या.
- प्रमुख पाहुणे बँक ऑफ बडोदा लातूरचे मेन ब्रांच चे चीफ  मॅनेजर श्री.अभिनव श्रीवास्तव यांचा परीचय रो. प्रशांत भाटगावे यांनी सभागृहाला करून दिली.
- श्री.श्रीवास्तव यांनी बँकेच्या डिजीटल व्यवहाराबाबत/फसवणूकीबाबत  ग्राहकानी काय दक्षता घ्यावी या बाबत सभागृहाला विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच डिजीटल कर्जाबाबत व मुदत ठेवी बाबत पण माहीती सांगीतली.
  काही सभासदानी त्यांच्या शंका विचारल्या, त्यांच्या शंकेचे निरसन श्री. अभिनव श्रीवास्तव यांनी केले.
- माहे ऑक्टोबर २०२५ मधील बैठकीस १००% उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे  गोविंद कुंचमवार काका यांनी जाहीर केली आणि त्या सदस्याना भेट वस्तू देवून त्यांचा  गौरव करण्यात आला

**Guest of The Meeting**



**Mr.Abhinav Shrivastav**

**Man of The Meeting**



**Rtn.Anil Takalkar**

**1st Come in the Hall**



**Rtn.Govind Kunchamwar**

## नोव्हेंबर : रोटरी फाउंडेशन महिना सेवेला समर्पित, मानवतेसाठी उभा असलेला एक पवित्र वारसा

रोटरी इंटरनॅशनलच्या वर्षभरातील विविध उपक्रमामध्ये नोव्हेंबर महिना विशेष महत्वाचा मानला जातो. कारण हा महिना Rotary Foundation Month म्हणून जगभर साजरा केला जातो. रोटरी फाउंडेशन ही रोटरीची परमार्थी, पारदर्शक आणि जागतिक प्रभाव निर्माण करणारी संस्था असून तिच्या माध्यमातून रोटरीने लाखो लोकांचे जीवन उजळून टाकले आहे.रोटरी फाउंडेशनचा आधार म्हणजे विश्वास, उत्तरदायित्व, आणि दीर्घकालीन परिवर्तन. या फाऊंडेशनचे प्रत्येक उपक्रम "Service Above Self – स्वार्थापेक्षा सेवा'' या रोटरीच्या मूलभूत तत्त्वाला जीवन देतात.

रोटरी फाउंडेशनचा इतिहास : सेवाभावाचे पायाभूत केंद्र रोटरीचे संस्थापक पॉल हॅरिस यांनी १९१७ मध्ये ''मानवजातीच्या कल्याणासाठी एक स्थायी निधी'' निर्माण करण्याचा विचार मांडला. त्या एका छोट्या संकल्पनेतून आजचे जगभरातील सर्वात विश्वसनीय मानवी सेवा निधी उभा राहिला आहे.आज रोटरी फाउंडेशनने आरोग्य, शिक्षण, पाणी, पर्यावरण, शांतता आणि सामाजिक या सर्व क्षेत्रांत केलेले काम ही १०० पेक्षा जास्त वर्षांच्या योगदानाची एक उज्ज्वल परंपरा आहे.रोटरी फाउंडेशनची प्रमुख लक्ष क्षेत्रे रोटरी फाउंडेशनने ठरवलेली सात लक्ष क्षेत्रे ही जग बदलवणारी आहेत

१.शांतता निर्माण व संघर्ष निवारण

रोटरीचे पीस फेलोशिप प्रोग्रॅम जगभरातील नेत्यांना प्रशिक्षण देत आहे. शांततेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे या कार्याचे मर्म आहे.

२.रोगनियंत्रण व उपचार

पोलियो निर्मूलनासारख्या अद्वितीय उपक्रमात रोटरी फाउंडेशनचा सिंहाचा वाटा आहे. याशिवाय क्षयरोग, मधुमेह, कर्करोग, माता-बाल आरोग्य, अशा अनेक क्षेत्रांत मदत.

३. Water, Sanitation & Hygiene (WASH)

पाणी, स्वच्छता व स्वच्छताविषयक सुविधा स्वच्छ पाणी, स्वच्छता व्यवस्था, शाळांमध्ये हँडवॉश स्टेशन, शौचालये उभारणेया सर्वांत रोटरीचे योगदान मोठे आहे.

४.माता व बाल आरोग्य

गर्भार महिलांसाठी तपासणी शिबिरे, नवजात बालकांसाठी उपचार, कुपोषणाविरुद्ध मोहीमा आणि सुरक्षित प्रसूतीसाठी मदत.

५.प्राथमिक शिक्षण व साक्षरता

शाळा दुरुस्ती, डिजिटल क्लासेस, शिक्षक प्रशिक्षण, गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यरोटरी शिक्षणाद्वारे भविष्य घडवत आहे.

६.समाज व आर्थिक विकास समूह विकास, उपजीविकेची साधने, कौशल्यविकास प्रशिक्षण, समुदाय उभारणीया सर्व प्रकल्पांतून लोकांचे जीवनमान उंचावले जाते.

७.पर्यावरण संरक्षण झाडे लावणे, संवर्धन, हवामान संरक्षण, स्वच्छ ऊर्जा प्रकल्प यांसाठी रोटरीने आंतरराष्ट्रीय स्तरावर भक्कम योगदान देणे सुरु केले आहे.

पोलियो निर्मूलन रोटरी फाउंडेशनची जगाला दिलेली सर्वांत मोठी भेट

रोटरीने १९८५ मध्ये सुरु केलेली पोलिओ प्लस मोहीम हा मानव इतिहासातील सर्वांत मोठा आरोग्य उपक्रम आहे. आज जगातील ९९% पोलिओ संपवण्याचे श्रेय रोटरी फाउंडेशनला जाते. WHO, UNICEF, बिल गेट्स फाउंडेशन अशा जागतिक संस्थांशी भागीदारी करून रोटरीने जगभरातील लाखो मुलांचे जीवन सुरक्षित केले.
ही मोहीम आजही रोटरीच्या प्रतिष्ठेला उंचावणारी मानली जाते.

ग्लोबल ग्रँट्स दीर्घकालीन, टिकाऊ समाजकार्यासाठी रोटरीची शक्ती

रोटरी फाउंडेशनचे Global Grants आणि District Grants हे रोटरी क्लबांना टिकाऊ आणि प्रभावी प्रकल्प करण्यास सक्षम करतात. Global Grants च्या माध्यमातून लाखो रुपयांचे प्रकल्प डायलेसिस सेंटर, ऑपरेशन थिएटर्स, डिजिटल क्लासरूम, WASH प्रकल्प, community development व बरेच उपक्रम देशभरात चालू आहेत.प्रत्येक प्रकल्प Needs Assessment, Sustainability, Impact, Accountability या घटकांवर आधारित असतो. त्यामुळे निधीचा अपव्यय होत नाही आणि प्रत्येक पैशाचा उपयोग योग्य ठिकाणी होतो.

रोटरी फाउंडेशन महिना का महत्त्वाचा ?

नोव्हेंबर महिन्यात जगभरातील सर्व रोटरी क्लब

- फाउंडेशनविषयी जनजागृती करतात
- क्लब प्रकल्पांत फाउंडेशनचा समावेश करतात
- Paul Harris Fellow / Major Donor वाढवण्यावर लक्ष देतात
- Endowment Fund आणि Annual Fund साठी देणगी संकलन करतात

फाउंडेशन कार्याचे रिपोर्ट, सेमिनार, प्रशिक्षण, सदस्यांसाठी माहिती उपक्रम आयोजित करतात

हा महिना म्हणजे फाउंडेशनच्या माध्यमातून अधिक व्यापक सेवा करण्याचा संकल्प करण्याचा काळ.

Paul Harris Fellow सेवाभावाचा गौरव

Annual Fund किंवा इतर फंडांना दिलेल्या योगदानातून Paul Harris Fellow (PHF), Major Donor, Bequest Society यांसारखे सन्मान मिळतात. हे सन्मान केवळ गौरवच नाहीत, तर मानवतेसाठी दिलेल्या योगदानाची जाणीव करून देतात.





## शुभेच्छापर भेट



रो.धीरज तिवारी यांना ५० व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना रोटरी परिवार

## अभिनंदन






### कवी रमेश चिल्ले यांना 'तिफण' काव्य पुरस्कार

रमेश चिल्ले

लातूर : कन्नड (जि. छत्रपती संभाजीनगर) तिफण वाचक चळवळ यांच्या वतीने उत्कृष्ट साहित्यकृतींना देण्यात येणारा 'ना. धों. महानोर तिफण काव्य पुरस्कार' लातूरमधील कवी रमेश चिल्ले यांच्या 'पाणीबाणी नंतरच्या कविता' या कवितासंग्रहाला जाहीर झाला आहे. याची घोषणा पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. शिवाजी हुसे, डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. दिलीप बिरुटे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. सुधाकर जाधव यांनी केली. चिल्ले यांचे 'ओस झाल्या दिशा', 'नांगरून पडलेले शतक', 'मातीवरची लिपी', 'पाणीबाणी नंतरच्या कविता' असे कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. याशिवाय, कथा, कादंबरी, ललित, बालसाहित्य, समीक्षेवरील २५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.



## Rotary Mid-Town November Projects











## Coming Soon...




## Congratulations




## Annapurna Donors this Month

**रोटरी अन्नपूर्णा योजना देणगीदाते**

१. रो. विशाल अयाचित - सर्व महिला लाभार्थींना साडी वाटप
२. रो. दिनेश सोनी - २५००/-
३. रो. ओमप्रकाश झुरळे व विद्यार्थी - १०,०००/-
४. रो. धिरेन तिवारी व सौ. तिवारी - २१,०००/

सर्वांचे मनापासून धन्यवाद



## स्व. विश्वास निशिकांतराव लातूरकर

# श्रद्धांजली

## 100% Attendence - November Month



1. Shradhhanand Apshetti
2. Amol Banale
3. Ajay Barule
4. Prashant Bhatgave
5. Amol Dadge
6. Govind Kunchamwar
7. Shrikant Panchakshari
8. Vishnudas ji Toshniwal
9. Virendra Pundipalle
10. Chetan Pandharikar
11. Motilal Varma
12. Rajgopal Tapdiya
13. Pawan Malpani
14. Kalash Mundada




**रोटरी अन्नपूर्णा आर्थिक उभारणीसाठी**

**मराठी नाटक**

## ऑल दि बेस्ट

**शनिवार दि.१३ डिसेंबर २०२५**
**सायं.७ वा.**
**दयानंद सभागृह, लातूर**

Concept
Design Studio

* Residential * Commercial
* Showrooms * Hospitality

KALASH MUNDADA
Interior Designer
7767091645
conceptstudio94@gmail.com

1st Floor, Beside At Home, Dayaram Road, LATUR.